**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२८/२०२६ मधील निशाणी क्र.०१ वरील आदेश**

कांताबाई व इतर वि. निरंक

(आदेश पारीत दिनांक – १३.०३.२०२६)

CNR No.MHLA060000842026

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम,१८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, नामे शकुंतला भ्र. त्र्यंबक गोरगीळे हिचा दिनांक २२.११.२०२५ रोजी मौजे उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर, जि.लातूर, येथे वयोवृध्द झाल्यामुळे मयत झाले आहे. (तद्नंतर 'शकुंतला भ्र. त्र्यंबक गोरगीळे' यांना वाक्यांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने 'मयत शकुंतला' असे संबोधण्यात येईल). मयत शकुंतला हिचे समयीचे कायदेशीर वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नांव | मयताशी नातेसंबंध |
|---|---|---|
| १. | कांताबाई भ्र. रामराव दावणकर | मुलगी |
| २. | बबन पि. त्र्यंबकराव गोरगीळे | मुलगा |
| ३. | मुक्ता भ्र. दिगांबर मलकुकर (मुक्ता पि. त्र्यंबक गोरगीळे) | मुलगी |
| ४. | चंद्रमाला भ्र. धर्मराज टाकळीकर | मुलगी |
| ५. | विश्वनाथ पि. त्र्यंबकराव गोरगीळे | मुलगा |

०३. अर्जदारांचे कथन असे की, वरील वारसदारां व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने मयताच्या मृत्यू पश्चात त्याच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्ता मयताचे कायदेशीर वारसदारांच्या नावे हस्तांतरण करणेकामी व इतरही कार्यालयीन कामकाजासाठी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केला आहे.

०४. दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम १ चे तरतुदीनुसार न्यायालयाचे मान्यतेने मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करु शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन जाहीर प्रगटनानंतर एक महिन्यांचे आत अर्जदाराचे हक्काबाबत आक्षेप घेण्यासाठी त्यांचे आक्षेप नोंदविणे गरजेचे असते. नियम ७ चा दुसरा भाग हा असे विदित करतो की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्चित करीत नसुन,

ते फक्त सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था व्यक्तीचे वारसासाठी दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजूर केलेले प्रमाणपत्र अंतिमत: हक्क निर्णित करीत नाही किंवा इतरांचे हक्कास इजा/हानी पोहोचवित नाही.

०५. अर्ज दाखल झाल्यानंतर दिवाणी न्यायालय क.स्तर, तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालय व ग्राम पंचायत कार्यालय, उमरगा कोर्ट यांचे नोटीस बोर्डवर जाहिरनामा (निशाणी क्र.७) प्रसिध्द करण्यात आला. अर्जदाराच्या विनंतीस कोणाचा आक्षेप आहे काय ? याबाबत न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदाराने दिनांक १९.०१.२०२६ रोजी ''दैनिक राजधर्म'' वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रगटन (निशाणी १०) प्रसिध्द करण्यात आले. परंतु आजतागायत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाला नाही.

०६. प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ अर्जदारांनी (निशाणी १२) अन्वये बबन पि. त्र्यंबकराव गोरगीळे यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. तसेच अर्जदाराने त्यांच्या स्वत:च्या आधार कार्डची सत्यप्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याने तिच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा तंतोतंत समावेश केला आहे. कथनांची पुनरावृत्ती टाळण्याच्या हेतूने तिच्या प्रतिज्ञापत्रातील कथने याठिकाणी मांडण्याची आवश्यकता नाही. शिवाय अर्जदारांनी निबंधक (जन्म आणि मृत्यु), ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा कोर्ट, ता. अहमदपूर जि.लातूर यांनी निर्गमित केलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी १६) व वारसाचे स्वयंघोषणापत्र (निशाणी ११) वर दाखल केले आहेत. सदर मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये मयत शकुंतला भ्र. त्र्यंबक गोरगीळे हिचा दिनांक २२.११.२०२५ रोजी उमरगा कोर्ट येथे मृत्यु झाल्याचे दिसून येते. तसेच वारसाचे स्वयंघोषणापत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अर्जदार हे मयत शकुंतला भ्र. त्र्यंबक गोरगीळे यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अर्जदार व वारस यांनी (नि.क्र.११ ते ११/४) कडे त्यांचे आधारकार्ड ओळखपत्राच्या पडताळलेल्या प्रती दाखल केली. तद्नंतर अर्जदाराने (निशाणी १७) अन्वये पुरसिस सादर करुन त्यांचा पुरावा बंद केला.

०७. अर्जदारांच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे मयत यास अर्जदार हे मयत शकुंतला भ्र. त्र्यंबक गोरगीळे यांचे वारस असल्याचे ग्राहय धरण्यास हरकत नाही. उपरोक्त विश्लेषणाअंती अर्जदार व वरील नमुद वारस यांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता, अर्जदार हे मयत शकुंतला भ्र. त्र्यंबक गोरगीळे यांचे कायदेशीर

वारस आहेत. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येते.

२. अर्जदार नामे ०१. कांताबाई भ्र. रामराव दावणकर, रा.लातूर ता.जि. लातूर ०२. बबन पि. त्र्यंबकराव गोरगीळे, रा.उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर, जि.लातूर ०३.मुक्ता भ्र. दिगांबर मलकुकर (मुक्ता पि. त्र्यंबक गोरगीळे) रा. शिरसाळा, ता.परळी वै. जि. बीड, ०४. चंद्रमाला भ्र. धर्मराज टाकळीकर रा. सोलापूर, ता.जि. सोलापूर व ०५. विश्वनाथ पि. त्र्यंबकराव गोरगीळे रा. उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर, जि.लातूर हे मयत शकुंतला भ्र. त्र्यंबक गोरगीळे रा. उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर, जि.लातूर यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते व सदरचा वारसा दाखला हा अर्जदार यास देण्यात येते.

३. दिवाणी पुस्तिका प्रकरण क्र.१४ मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मूळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमूद करावी.

४. अर्जदारांनी आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर).

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.03.13 17:25:40 +0530

स्थळ : अहमदपूर.
दिनांक : १३.०३.२०२६.

(एम. सी. हासगे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.